म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.
IRBK-0103665
IRBK-0103665

१५७४



ोन हंस पक्षी व कासव यांची गोष्ट ... ३६–३८
ोन माशांची गोष्ट ... ... ... ३९–४०
क मूर्ख बगळा, काळा साप आणि मुंगूस यांची गोष्ट ... ४०–४१
क महंत व उंदीर यांची गोष्ट ... .. ... ४१–४३
ोभी [illegible]कोचा आणि हुषार खेकडा यांची गोष्ट ... ४३–४५
क भोळा ब्राह्मण आणि तीन दगलबाज यांची गोष्ट ... ४५–४७
दुष्ट साप आणि बेडकांचा मूर्ख राजा यांची गोष्ट ... ४७–४९
अविचारी ब्राह्मण व इमानी मुंगूस यांची गोष्ट ... ४९–५०
सिंह, कावळा, वाघ, कोल्हा व उंट यांची गोष्ट ... ५०–५२

८०६०७ बा.वा.
३८२७ २।८।०३

IRBK-0103665
IRBK-0103665

## गोष्ट १ ली

# एक कावळा, शिकारी, कबुतरे आणि उंदीर यांची गोष्ट

गोदावरी नदीच्या तीरावर, एक भले मोठे झाड होते. या झाडावर निवाऱ्यासाठीं रात्रीच्या वेळी अनेक ठिकाणाहून पक्षी येत असत.

एके दिवशी अगदी पहाटे, चंद्र पश्चिमेकडील डोंगराआड बुडत असताना, या झाडावरील एक कावळा जागा झाला व या झाडाकडे येत असलेल्या एका शिकाऱ्याला त्याने पाहिले. तो शिकारी जणू मृत्यूची देवता यमच असावा असा दिसला. त्याला पाहिल्याबरोबर कावळा घाबरला व स्वतःशी विचार करू लागला: "खरोखरीच हा अपशकुन आहे. आता काय संकट ओढवणार मला समजत नाही."

असा विचार करीत तो कावळा त्या शिकाऱ्याच्या मागोमाग उडत निघाला.

काही वेळाने तो शिकारी एके जागी थांबला, व सभोवार पाहू लागला. त्याने आपल्या पिशवीतून तांदूळ काढून ते सर्वत्र पसरवून टाकले व आपले जाळे पसरून ठेवले. एवढे करून तो एके ठिकाणी झाडामागे लपून बसला.

त्या वेळी एक कबुतरांचा राजा आपल्या अनुयायांबरोबर अन्न शोधण्यासाठी आकाशात भरारी मारीत चालला होता. त्याला चोहोकडे तांदूळ पसरलेले दिसले तेव्हां तो आपल्या अनुयायांना म्हणाला: " असल्या ह्या माणूस रहात नसलेल्या जंगलात तांदूळ कोठून आले असतील? सर्वांआधी ही काय भानगड आहे हे आपल्याला शोधून काढायला हवे. मला स्वतःला तर यापासून काही फायदा होईल असे वाटत नाही. "

परंतु अधाशीपणामुळे कबुतरांनी आपल्या राजाचे म्हणणे मान्य केले नाही व तांदळाचे कण टिपण्यासाठी ते खाली उतरले. आणि अरेरे ! ते सारे त्या जाळ्यात अडकून पडले.

आता त्यांच्यामधे खूपच गडबड उडाली. त्यावर राजा म्हणाला: " खरोखरीच हा एक भयंकर धोक्याचा प्रसंग आहे. आणि आतांच आपली भीति बाजूला सारून एक योजना तयार न करू तर माझी खात्री आहे कीं आपण सारे मरून जाऊ. मी असे सुचवितो, आपण या जाळ्यासकट एकसंघ उडून जाऊ या. "

पक्षी या त्याच्या म्हणण्याला कबूल झाले. त्यांनी जाळे आपापल्या चोचीत व पायात पकडून एकदम उंच आकाशात उड्डाण केले.

शिकाऱ्याने हे पाहिल्यावर तो आश्चर्यचकित झाला व आता काय करावे हे त्याला सुचेना. पण त्याने आपल्या मनाचा निर्धार केला व तो त्यांच्या मागोमाग धावत सुटला. त्याच वेळी त्याने असाही विचार केला. " या पक्ष्यांनी एकमत करून हे यश मिळविले. पण ते पुनः खाली उतरले की ते सापडतीलच माझ्या हातात. "

पण ते पक्षी खूप जोराने उंच उडाले व थोड्याच वेळात दिसेनासे झाले. ते पक्षी आतां आपल्या राजाला विचारू लागले. " आतां आपण काय करावे बरे ? "

" गोदावरी नदीच्या तीरावर रहाणारा एक उंदीर माझा परमप्रिय मित्र आहे. चला आपण त्याच्याचकडे जाऊ या. तो खात्रीने आपल्याला ह्या जाळ्यातून मोकळे करील. "

म्हणून ते सारे पक्षी तो उंदीर रहात असलेल्या ठिकाणी जाऊन पोहोचले. हे पक्षी आपल्याकडे उडत खाली उतरत आहेत असे पाहून तो उंदीर खूप घाबरला, आणि झाडाखालील आपल्या बिळात पार नाहीसा झाला !

अशा वेळी तो कबुतरांचा राजा ओरडून म्हणाला, " अरे मित्रा ! तू मला ओळखले नाहीस ? चल बाहेर ये आणि आम्हाला मोकळे कर. "

त्या उंदराने हे ऐकल्यावर आपल्या प्रिय मित्राचा आवाज ताबडतोब ओळखला व तो लगेच बिळाच्या बाहेर आला. कबुतरांच्या राजाने झालेली सर्व हकीकत त्याला सांगितली व उंदराने ताबडतोब जाळ्याच्या तांती कुरतडण्यास सुरुवात केली व साऱ्या कबुतरांना मोकळे केले.

झाडावर बसून हे सर्व पहात असलेल्या कावळ्याला त्यांच्या मैत्रीचे फार आश्चर्य वाटले व तो स्वतःशी विचार करू लागला, " अडीअडचणीच्या वेळी उपयोगी पडेल तोच खरा मित्र. "

## गोष्ट २ री

# एक लबाड म्हातारा वाघ व हपापलेला प्रवासी यांची गोष्ट

कोणे एकेकाळी एक वाघ होता; तो आतां इतका म्हातारा झाला होता की त्याला बाहेर जाऊन शिकार करणे अशक्य झाले होते. म्हणून त्याने एक युक्ति योजिली.

एका सुंदर सकाळच्या वेळी त्याने एका तळ्यात स्नान केले; आपल्या एका पंजात कुश गवताची एक काडी धरून व दुसऱ्या पंजात एक सोन्याचे कडे धरून तो मोठ्याने ओरडून म्हणू लागला, "अहो प्रवाशानो ! घ्या, घ्या हे सोन्याचे कडे ! नुसते मागितलेत तरी तुम्हाला ते मिळेल !"

ह्या प्रवाश्यांच्यापैकी एकाला ह्या कड्याचे आकर्षण वाटले; तो उभा राहून विचार करू लागला. "अशा गोष्टी मोठ्या भाग्यानेच घडत असतात. पण आपल्या जिवाला त्यापासून धोका असेल तर माणसाने सावध असणे योग्य ठरेल. म्हणून मी पहिल्याने पहातो हे काय आहे ते !"

मग तो प्रवासी वाघाला उघडपणे म्हणाला. "कुठे आहे ते तु(आ)पल्या कडे ?"

वाघाने आपला पंजा वर करून ते कडे त्याला दाखविले.

"पण मी तुझ्यावर विश्वास कसा ठेवू ? तू माणसांचे जीव घेणारा वाघ आहेस !"

"हे प्रवाश्या, ऐक नीट ध्यान देऊन," वाघाने उत्तर दिले.

" मी कबूल करतो कीं तरुणपणी मी फार दुष्ट होतो व मी किती तरी गाई आणि माणसे मारून खाल्ली. माझ्या ह्या दुष्ट वागण्याने माझी बायको व मुले मरून गेली. नंतर एका महंताने मला दानधर्म करण्याचा उपदेश केला. म्हणून मी रोज सकाळी आंघोळ करून भोजन व पैसे दान देऊ लागलो. शिवाय, मी आतां अगदी म्हातारा झालो आहे. दात व पंजे आता पार पडून गेले आहेत. आतां तू माझ्यावर अजून विश्वास ठेवणार नाहीस ? "

त्याच्या ह्या मानभावी बोलण्याने प्रवाश्याच्या मनावर चांगलाच परिणाम झाला व तो आंघोळ करण्यासाठी पाण्यात उतरला असता खोल चिखलात अडकून पडला.

हे पाहून तो वाघ त्या प्रवाशाचे समाधान करू लागला, " अरेरे ! भिऊ नकोस ! हा मी आलो पहा तुझ्या मदतीला." असे म्हणून तो वाघ पाण्यातून त्या प्रवाश्याकडे आस्ते आस्ते निघाला व जवळ येताच त्याने त्याला पकडले. " अरेरे ! ह्याच्या धार्मिक बोलण्यावर विश्वासून मी साफ फसलो. बदमाष हा नेहमी बदमाषच असायचा, त्याच्यावर आपण कधीही विश्वास ठेवता कामा नये. त्याच्यावर विश्वास ठेवण्याचा मी मूर्खपणा केला. मला आतां त्याचा परिणाम भोगलाच पाहिजे ! "

एवढ्या वेळात त्या वाघाने प्रवाश्याला चिखलातून बाहेर काठावर ओढून काढले व खाऊन टाकले.

**तात्पर्य** : बदमाष हा नेहमीच बदमाषी करणार. मूर्ख माणसेच त्याच्यावर विश्वास ठेवीत असतात व शेवटी आपला घात करून घेतात.

## गोष्ट ३ री

# एक हरीण, कावळा व कोल्हा यांची गोष्ट

एका मोठ्या जंगलामधे एक हरीण व एक कावळा रहात असत. त्यांची दाट मैत्री होती. ते हरीण गवत चारा खाऊन चांगले गुबगुबीत झाले असून साऱ्या जंगलभर मन मानेल तसे भटकत असे. त्याला कशाचीही फिकीर वाटत नव्हती.

एके दिवशी हे गुबगुबीत हरीण एका कोल्ह्याच्या दृष्टीस पडले. "या गुबगुबीत हरणाचे लुसलुशीत मांस खाण्यात काय मजा येईल. ठीक पहिल्याने आपण त्याच्याशी दोस्ती केली पाहिजे." तो कोल्हा स्वत:शीच विचार करू लागला. असा विचार करून तो कोल्हा हरणाच्या जवळ आला व त्याला नमस्कार करून म्हणाला, "कसं काय मित्रा ! तुझं ठीक चाललं आहे ना ?"

"कोण रे तू ?" हरिणाने विचारले.

"मी कोल्हा आहे. मी ह्या मोठ्या जंगलात एकटाच रहात असतो, मला एकही मित्र नाही. आतां तू मला भेटलास, तुझ्याशी मैत्री करायची माझी इच्छा आहे, आणि तू सांगशील ते करायला मी तयार आहे."

"तर मग तसेच होऊ दे." हरिणाने उत्तर दिले.

सूर्य अस्ताला गेल्यावर दोघेही हरिणाच्या घराकडे ज.यला निघाले. तेथून जवळच झाडाच्या एका फांदीवर हरिणाचा मित्र कावळा

रहात होता. कोल्ह्याला पाहिल्यावर तो म्हणाला, "मित्रा हरिणा, हा रे कोण आहे तुझ्याबरोबर ?"

"हा कोल्हा आहे. त्याला आपल्याशी दोस्ती करायची आहे म्हणून तो माझ्याबरोबर आला आहे," हरिणाने उत्तर दिले.

"अनोळखी माणसाशी मैत्री, आणि तीही अकस्मात, हे योग्य नव्हे. त्याच्या कुटुंबाविषयी किंवा त्याच्या वर्तणुकीविषयी तुला काही एक माहीत नाही. तर तू त्याला आश्रय कसा देणार ?" कावळा म्हणाला.

"अरे कावळ्या ! तू ह्या हरिणाला पहिल्याने भेटलास तेव्हा तुला ह्याच्याविषयी काही माहिती होती का ? त्याचे कुटुंब, त्याची वागणूक ? मग तुम्ही एकमेकांचे मित्र कसे बनलात, आज तुम्ही आहात तसे ?" कोल्हा अंमळ रागानेच गुरगुरला. "आपण सारेच एकमेकांचे मित्र बनू या !"

"हा वाद आता पुरे ! चला आपण सारे एकत्र राहू या मित्र या नात्याने. आपल्या वागणुकीनेच आपण एकमेकांचे मित्र किंवा शत्रू बनत असतो," हरीण म्हणाला.

"ठीक, तर मग तसेच होऊ द्या," कावळा म्हणाला.

म्हणून ते आता एकत्र राहू लागले.

अशा रीतीने काही काळ लोटला.

एके दिवशी तो कोल्हा हरिणाला विश्वासात घेऊन म्हणाला,

"मित्रा ! ह्या जंगलाच्या दुसऱ्या एका भागात खूप धान्य असलेले एक शेत आहे. तुला तिकडे घेऊन जाऊन ते मी दाखवू पाहतो."

कोल्ह्याने हरिणाला आपल्या बरोबर नेऊन ते शेत त्याला दाखवले.

त्यानंतर ते हरीण रोज शेतावर जाऊन पोटभर पिके खावू लागले.

आपल्या शेतावरील कणसे कोणीतरी रोज येऊन खात असते हे पाहिल्यावर त्या शेताच्या मालकाने एक जाळे पसरवून ठेवले व एके दिवशी ते हरीण त्यात सांपडले.

" आता माझ्या मित्राशिवाय ह्या जाळ्यातून माझी कोण सुटका करणार ? " हरीण स्वतःशी विचार करू लागले.

तों इतक्यात तो कोल्हा तेथे आला व स्वतःशी विचार करू लागला.

" आता माझी इच्छा पूर्ण होईल. शेताच्या मालकाने ह्याला मारून टाकले की त्याचे मांस मला कित्येक दिवस पुरेल. "

हरिणाने कोल्ह्याला आलेला पाहिल्यावर मोठ्याने ओरडून म्हटले. " अरे मित्रा ! अरे मला मेहेरबानी करून यातून सोडीव रे ! तुझ्यासारखा मित्रच मला या संकटातून सोडवू शकेल ! "

" पण मित्रा ! हे जाळे तातीने विणलेले आहे. त्याला मी आज तोंड कसे लावू शकेन बरे ? आज तर माझा उपासाचा दिवस आहे ! माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नकोस बरं ! उद्या सकाळी उठल्या-बरोबर मी तुझी ही तात तडातड तोडून टाकीन. "

सूर्य अस्ताला जाण्याच्या वेळी हरीण घरी परत आले नाही म्हणून कावळ्याला खूप काळजी वाटू लागली. म्हणून तो हरिणाच्या शोधासाठी निघाला व शेवटी त्या धान्याच्या शेतावर येऊन पोहोचला. त्याला एकदम ते हरीण दिसले.

" मित्रा हरिणा ! काय रे तुझी ही गत. " कावळा दुःखाने म्हणाला.

" मित्राचा उपदेश ऐकला नाही तर अशीच गत व्हायची म्हणायची ! "

हरिणाने उत्तर दिले. मग त्याने कावळ्याला त्या कोल्ह्याने हे शेत दाखवून कसे फसवून अडकवून टाकविले हे सारे सविस्तरपणे सांगितले.

" कुठे आहे तो बदमाष ? " कावळ्याने रागाने विचारले.

" तो इथेच कुठे तरी लपून बसला असला पाहिजे माझे मांस खाण्याच्या हेतूने ! "

" अनोळखी माणसावर विश्वास ठेवू नकोस असे मी तुला बजावले होते, पण त्याची तू पर्वा केली नाहीस ! "

कावळा दुःखाचे उसासे टाकून म्हणाला, " अरे लुच्च्या कोल्ह्या ! लबाडा दुष्टा ! काय केलेस तू हे ? तुझ्यावर विश्वास टाकणाऱ्या माणसांना तू असा फसवितोस ? खरोखरी दुष्ट माणसाशी मैत्री नेहमी टाळलीच पाहिजे.'

असे म्हणून त्या कावळ्याने तेथेच राहून आपल्या मित्राचा सांभाळ करण्याचे ठरविले.

दुसरे दिवशी सकाळी तो शेताचा मालक हातात एक भला मोठा सोटा घेऊन शेतावर आला. त्याला इकडे येताना पाहिल्यावर कावळा हरणाला म्हणाला " आटप लवकर ! मी सांगतो तसे कर ! मेल्याचे ढोंग करून पोट फुगवून गुपचूप पडून रहा, व मी काव काव असा आवाज केला की जीव मुठीत घेऊन धूम पळत सूट "

काही एक हालचाल न करीता ते हरीण मेल्यासारखे शांतपणे पडून राहिले.

तो मालक त्या हरणाच्या अगदी जवळ आला तेव्हां त्याचा चेहरा आनंदाने खुलला व तो स्वतःशीच म्हणाला, " किती छान ! हरीण

आपोआपच मरून गेले आहे." असे म्हणून त्याने ते हरीण जाळ्यातून बाहेर काढले व जाळे गोळा करण्यात तो गुंतून गेला. त्याचक्षणी कावळ्याने काव काव असा आवाज केला व हरीण अत्यंत चपळाईने धूम पळाले. मालकाला विलक्षण आश्चर्य वाटले. त्याने ताबडतोब हरणावर तो सोटा फेकून मारला पण तो त्याला न लागता जवळच लपून बसलेल्या कोल्ह्याला लागला व तो जागच्या जागी मरून पडला.

**तात्पर्य :** एखाद्या अनोळखी माणसाशी ओळख करण्याअगोदर पूर्ण विचार करा. नाहीतर परिणाम घातुक झाल्याशिवाय रहाणार नाही.

## गोष्ट ४ थी

# एक शिकारी, हरीण, डुक्कर आणि कोल्हा यांची गोष्ट

एका अरण्यात एक शिकारी रहात होता.

एके दिवशी सकाळच्या शांत वेळी तो आपल्या घरातून बाहेर घाला; आपण एका हरणाची शिकार करू अशी त्याला आशा वाटत ोती. सुदैवाने त्याने एका हरणाला ठार मारले व त्याला आपल्या ठीवर लादून संध्याकाळच्या वेळी तो घरी जाण्यासाठी निघाला.

वाटेत त्याला एक गलेलठ्ठ डुक्कर दिसले. त्याबरोबर पाठीवरचे ोण खाली जमिनीवर ठेवून त्याने त्या डुकरावर एक तीर सोडला. बरोबर त्या डुकराने एक कर्णकर्कश डरकाळी फोडली व सर्व शक्ति

एकवटून त्या शिकाऱ्याला ढुश्शी मारली. त्याची ढुश्शी शिकाऱ्याच्या पोटावर जोराने लागली व तो तात्काळ मरून पडला.

ते डुक्कर सुद्धा काही वेळाने मरून पडले.

ह्या झटापटीत तेथून सरपटत जात असलेल्या सापावर कोणाचा तरी पाय पडून तो चिरडला गेला व तो मरून पडला.

काही वेळाने खाद्य हुडकण्यासाठी एक कोल्हा तेथे आला जेव्हा त्याने मरून पडलेला शिकारी, डुक्कर, साप व हरीण हे सारे तेथे पाहिले तेव्हा त्याने मोठ्या आनंदाने स्वतःशीच विचार केला, " काय सुदैव माझे ! मला वाटते आतां माझी खाद्याची चंगळ झाली. हे कितीतरी दिवस मला पुरेल पण मी प्रत्येक वेळी थोडेसेच खात जाईन. "

असा विचार करून त्याने शिकाऱ्याची धनुष्याची तात कुरतडायला सुरुवात केली. एकदम ती धनुष्याची तात ताडकन तुटली व धनुष्य त्याच्या छातीवर जोराने आपटले. त्या बरोबर तो कोल्हा जागच्या जागी मरून पडला.

**तात्पर्य** : अति आशा केव्हांही करता कामा नये, कारण त्याचे प्रायश्चित्त मिळाल्याशिवाय रहात नाही.

## गोष्ट ५ वी

# आंधळे गिधाड, पक्षी आणि मांजर यांची गोष्ट

एका नदीच्या काठावर एक टेकडी होती. त्या टेकडीच्या पायथ्याशी एक भले मोठे झाड होते. ह्या झाडाच्या एका पोकळीत एक आंधळे गिधाड रहात असे.

ह्याच झाडावर अनेक पक्षी रहात असत आणि कनवाळूपणे ते आपापल्या चाऱ्यातील काही भाग त्या आंधळ्या गिधाडाला देत असत. हे त्यांचे उपकार स्मरून ते गिधाड हे पक्षी बाहेर चारा शोधण्यासाठी उडून जात त्यावेळी त्यांच्या लहान लहान पिल्लांचे रक्षण करीत असे.

ह्या पक्ष्यांची पिल्ले खाण्याच्या हेतूने एक मांजर त्या ठिकाणी आले. त्याला आलेला पाहिल्याबरोबर पिल्लांनी विलक्षण किलबिलाट सुरू केला. त्या आंधळ्या गिधाडाने तो किलबिलाट ऐकल्याबरोबर "कोण आहे ते?" असे मोठ्याने ओरडून विचारले.

त्या मांजराला तेथे असलेले गिधाड पाहून भयंकर भीति वाटली व ते स्वत:शीच म्हणाले, "अरेरे! आतां माझे मरण ओढवले पण आलेल्या संकटाला तोंड द्यायला मला तयार झालेच पाहिजे. पण ते कसे? मला सर्वाआधी ह्या गिधाडाच्या मनांत विश्वास उत्पन्न केला पाहिजे."

"मी आपल्याला लवून मुजरा करायला आलो आहे," मांजर म्हणाले.

"पण कोण आहेस तूं?" गिधाडाने विचारले.

"मी एक गरीब मांजर आहे." त्याने उत्तर दिले.

"तू इथून मुकाट्याने चालता हो नाही तर मी तुला फाडून खाऊन टाकीन." गिधाड गरजले.

"महाराज, आधी माझे म्हणणे तर ऐकून घ्याल!" मांजर म्हणाले, "मग वाटेल तर मला आपण खुशाल मारू शकता. पण एकादा

दुसऱ्या एखाद्या कुळातला आहे म्हणूनच त्याला आपण ठार मारीत असता होय ?"

"बरं तर मग !" गिधाड म्हणाले : "मी तुझे म्हणणे ऐकून घ्यायला तयार आहे. पण मला अगोदर सांग तूं इथं आलासच कशाला ?"

"मी जवळच इथं गंगा नदीच्या पवित्र तीरावर रहात असतो." मांजर सांगूं लागले.

"मी मांस मुळीच खात नाही, रोज गंगेच्या पवित्र पाण्यात आंघोळ करीत असतो आणि माझ्या पापांचे क्षालन व्हावे म्हणून घोर तपश्चर्या करीत असतो. येथील दुसऱ्या पक्ष्यांना माझी ही हकीकत समजली तेव्हां ते मला म्हणाले,

'येथे रहात असलेल्या वृद्ध गिधाडापासून धर्माचे शिक्षण घे. ते गिधाड धर्मविषयात अत्यंत प्रवीण असून फार बुद्धिवान आहे.' अशी त्या सर्वांनी आपली स्तुति केली. म्हणून मी आपल्याला वंदन करण्यासाठी मुद्दाम इथे आलो आहे आणि इथं येऊन पहातो तर आपण माझ्यासारख्या एका गरीब मांजराला ठार मारायला तयार झाला आहात ! त्याच्या उलट अतिथीला योग्य असे आपण माझे स्वागत करायला हवे. आपल्यापाशी मला देण्यासाठी अन्न नसेल पण निदान प्रेमळ शब्द तरी ?"

"पण तूं मांस खाणारा आहेस आणि इथं तर पक्ष्यांची पिल्लें रहात असतात ! तर तूंच सांग तुझ्यावर माझा विश्वास कसा बसेल ?" ते आंधळे गिधाड म्हणाले.

हें ऐकल्यावर मांजराने आपले मस्तक झुकवून जमीनीला टेकविले व आपला सच्चेपणा दाखविण्यासाठी कानावर पंजे ठेवले. "मी सारी

आपोआपच मरून गेले आहे." असे म्हणून त्याने ते हरीण जाळ्यातून बाहेर काढले व जाळे गोळा करण्यात तो गुंतून गेला. त्याचक्षणी कावळ्याने काव काव असा आवाज केला व हरीण अत्यंत चपळाईने धूम पळाले. मालकाला विलक्षण आश्चर्य वाटले. त्याने ताबडतोब हरणावर तो सोटा फेकून मारला पण तो त्याला न लागता जवळच लपून बसलेल्या कोल्ह्याला लागला व तो जागच्या जागी मरून पडला.

**तात्पर्य :** एखाद्या अनोळखी माणसाशी ओळख करण्याअगोदर पूर्ण विचार करा. नाहीतर परिणाम घातुक झाल्याशिवाय रहाणार नाही.

## गोष्ट ४ थी

# एक शिकारी, हरीण, डुक्कर आणि कोल्हा यांची गोष्ट

एका अरण्यात एक शिकारी रहात होता.

एके दिवशी सकाळच्या शांत वेळी तो आपल्या घरातून बाहेर घाला; आपण एका हरणाची शिकार करू अशी त्याला आशा वाटत ती. सुदैवाने त्याने एका हरणाला ठार मारले व त्याला आपल्या ठीवर लादून संध्याकाळच्या वेळी तो घरी जाण्यासाठी निघाला.

वाटेत त्याला एक गलेलठ्ठ डुक्कर दिसले. त्याबरोबर पाठीवरचे ण खाली जमिनीवर ठेवून त्याने त्या डुकरावर एक तीर सोडला. बरोबर त्या डुकराने एक कर्णकर्कश डरकाळी फोडली व सर्व शक्ति

एकवटून त्या शिकाऱ्याला ढुश्शी मारली. त्याची ढुश्शी शिकाऱ्याच्या पोटावर जोराने लागली व तो तात्काळ मरून पडला.

ते डुक्कर सुद्धा काही वेळाने मरून पडले.

ह्या झटापटीत तेथून सरपटत जात असलेल्या सापावर कोणाचा तरी पाय पडून तो चिरडला गेला व तो मरून पडला.

काही वेळाने खाद्य हुडकण्यासाठी एक कोल्हा तेथे आला जेव्हा त्याने मरून पडलेला शिकारी, डुक्कर, साप व हरीण हे सारे तेथे पाहिले तेव्हा त्याने मोठ्या आनंदाने स्वतःशीच विचार केला, " काय सुदैव माझे ! मला वाटते आतां माझी खाद्याची चंगळ झाली. हे कितीतरी दिवस मला पुरेल पण मी प्रत्येक वेळी थोडेसेच खात जाईन. "

असा विचार करून त्याने शिकाऱ्याची धनुष्याची तात कुरतडायला सुरुवात केली. एकदम ती धनुष्याची तात ताडकन तुटली व धनुष्य त्याच्या छातीवर जोराने आपटले. त्या बरोबर तो कोल्हा जागच्या जागी मरून पडला.

**तात्पर्य** : अति आशा केव्हांही करता कामा नये, कारण त्याचे प्रायश्चित्त मिळाल्याशिवाय रहात नाही.

### गोष्ट ५ वी

# आंधळे गिधाड, पक्षी आणि मांजर यांची गोष्ट

एका नदीच्या काठावर एक टेकडी होती. त्या टेकडीच्या पायथ्याशी एक भले मोठे झाड होते. ह्या झाडाच्या एका पोकळीत एक आंधळे गिधाड रहात असे.

ह्याच झाडावर अनेक पक्षी रहात असत आणि कनवाळूपणे ते आपापल्या चाऱ्यातील काही भाग त्या आंधळ्या गिधाडाला देत असत. हे त्यांचे उपकार स्मरून ते गिधाड हे पक्षी बाहेर चारा शोधण्यासाठी उडून जात त्यावेळी त्यांच्या लहान लहान पिल्लांचे रक्षण करीत असे.

ह्या पक्ष्यांची पिल्ले खाण्याच्या हेतूने एक मांजर त्या ठिकाणी आले. त्याला आलेला पाहिल्याबरोबर पिल्लांनी विलक्षण किलबिलाट सुरू केला. त्या आंधळ्या गिधाडाने तो किलबिलाट ऐकल्याबरोबर "कोण आहे ते?" असे मोठ्याने ओरडून विचारले.

त्या मांजराला तेथे असलेले गिधाड पाहून भयंकर भीति वाटली व ते स्वतःशीच म्हणाले, "अरेरे! आतां माझे मरण ओढवले पण आलेल्या संकटाला तोंड द्यायला मला तयार झालेच पाहिजे. पण ते कसे? मला सर्वांआधी ह्या गिधाडाच्या मनांत विश्वास उत्पन्न केला पाहिजे."

"मी आपल्याला लवून मुजरा करायला आलो आहे," मांजर म्हणाले.

"पण कोण आहेस तूं?" गिधाडाने विचारले.

"मी एक गरीब मांजर आहे." त्याने उत्तर दिले.

"तु इथून मुकाट्याने चालता हो नाही तर मी तुला फाडून खाऊन टाकीन." गिधाड गरजले.

"महाराज, आधी माझे म्हणणे तर ऐकून घ्याल!" मांजर म्हणाले, "मग वाटेल तर मला आपण खुशाल मारू शकता. पण एकादा

दुसऱ्या एकाद्या कुळातला आहे म्हणूनच त्याला आपण ठार मारीत असता होय ? "

" बरं तर मग ! " गिधाड म्हणाले : "मी तुझे म्हणणे ऐकून घ्यायला तयार आहे. पण मला अगोदर सांग तूं इथं आलासच कशाला ? "

" मी जवळच इथं गंगा नदीच्या पवित्र तीरावर रहात असतो. " मांजर सांगूं लागले.

" मी मांस मुळीच खात नाही, रोज गंगेच्या पवित्र पाण्यात आंघोळ करीत असतो आणि माझ्या पापांचे क्षालन व्हावे म्हणून घोर तपश्चर्या करीत असतो. येथील दुसऱ्या पक्ष्यांना माझी ही हकीकत समजली तेव्हां ते मला म्हणाले,

' येथे रहात असलेल्या वृद्ध गिधाडापासून धर्माचे शिक्षण घे. ते गिधाड धर्मविषयात अत्यंत प्रवीण असून फार बुद्धिवान आहे.' अशी त्या सर्वांनी आपली स्तुति केली. म्हणून मी आपल्याला वंदन करण्यासाठी मुद्दाम इथे आलो आहे आणि इथं येऊन पहातो तर आपण माझ्यासारख्या एका गरीब मांजराला ठार मारायला तयार झाला आहात ! त्याच्या उलट अतिथीला योग्य असे आपण माझे स्वागत करायला हवे. आपल्यापाशी मला देण्यासाठी अन्न नसेल पण निदान प्रेमळ शब्द तरी ? "

" पण तूं मांस खाणारा आहेस आणि इथं तर पक्ष्यांची पिल्लें रहात असतात ! तर तूंच सांग तुझ्यावर माझा विश्वास कसा बसेल ? " ते आंधळे गिधाड म्हणाले.

हें ऐकल्यावर मांजराने आपले मस्तक झुकवून जमीनीला टेकविले व आपला सच्चेपणा दाखविण्यासाठी कानावर पंजे ठेवले. " मी सारी

धार्मिक पुस्तके अभ्यासली आहेत आणि कोणाचीही हिंसा करता कामा नये हे महातत्व मी शिकलो आहे. हे सारे अरण्य भाउयांनी संपूर्ण भरलेले आहे. तर मी पक्ष्यांना मारून खाण्याचे पातक कसा करू शकेन बरे ?"

अशा तऱ्हेने त्या मांजराने आंधळ्या गिधाडाच्या अंतःकरणात विश्वास उत्पन्न केला आणि त्याने त्याला झाडाच्या खालच्या ढोलीत रहाण्याची परवानगी दिली.

दिवसामागून दिवस जाऊ लागले, आणि त्या लबाड मांजराने एकामागून एक पक्ष्यांची पिल्ले खाण्यास सुरुवात केली. अर्थातच इथे काय चालले आहे ह्याचा त्या आंधळ्या गिधाडाला थांग ना पत्ता ! पण पक्ष्यांना आपली पिल्ले नाहीशी होत आहेत हे कळून आल्यावर त्यांनी त्यांचा शोध करायला सुरुवात केली.

आतां आपला खेळ आटोपला हे त्या मांजराला कळून चुकल्यावर ते तेथून गुपचूप पसार झाले.

यानंतर काही दिवसांनी त्या पक्ष्यांना आपल्या पिलांची हाडे ढोलीत सांपडली. "अरेरे !" ते सारे पक्षी म्हणाले, "खात्रीने ह्या म्हाताऱ्या, आंधळ्या गिधाडानेच ही आमची पिल्ले मारून खाऊन टाकली असली पाहिजेत." म्हणून त्यांनी त्या गिधाडाला ठार मारून टाकले.

त्या गिधाडाने अनोळखी मांजराला विश्वासाने आपल्या जवळ केले म्हणून त्याचा घात झाला !

## गोष्ट ६ वी

# एक हत्ती व लबाड म्हाताऱ्या कोल्ह्याची गोष्ट

कोणे एके काळी एका घनदाट अरण्यात एक हत्ती रहात असे. कोल्ह्यांचा एक कळप खाद्य शोधण्यासाठी निघाला असता त्याला हा हत्ती दिसला.

" हा हत्ती कसेही करून मेला तर आम्हाला हे खाद्य कितीतरी महिने पुरेल, " ते कोल्हे स्वतःशी म्हणाले.

त्यावर एक म्हातारा कोल्हा म्हणाला, " माझ्या अक्कल हुषारीने मी त्याचा मृत्यू घडवून आणीन ! "

हा म्हातारा लबाड कोल्हा त्या हत्तीपाशी गेला व त्याला लवून नमस्कार करून म्हणाला, " महाराज ! आपण आपली कृपादृष्टी एक क्षणभर माझ्याकडे फिरविण्याची मेहेरबानी करा. "

" तू कोण ? आणि का आलास तू माझ्याकडे " हत्तीने विचारले.

" आम्ही असा निर्णय घेतला आहे कीं राजाच्या आसऱ्याशिवाय जिवंत रहाणे फार कठीण आहे. आणि महाराज आपण राजाच्या सर्व गुणांनी संपन्न आहात म्हणून आम्ही आपल्याला आमचा राजा निवडला आहे. आमच्या ज्योतिषाने आपल्याला राज्याभिषेक कधी करायचा याचा मुहूर्त पण ठरवून टाकला आहे, आणि ती वेळ आतां अगदी जवळ येत चालली आहे, म्हणून आपण या समारंभासाठी आमच्या पाठोपाठ थोडाही विलंब न लावता चलावे," असे बोलून तो कोल्हा चालू लागला.

त्या लबाड कोल्ह्याच्या बोलण्यावर खुष होऊन आणि राज्यपद आपल्याला मिळणार ह्या महत्त्वाकांक्षेने तो हत्ती कोल्ह्याच्या मागोमाग निघाला.

तो कोल्हा चिखलाने भरलेल्या तळ्यावरून चालू लागला. पण हत्ती खूपच जाडजूड असल्याने त्या चिखलात फसला. त्याने बाहेर येण्याची खूप खटपट केली, पण व्यर्थ.

"अरे दोस्ता! आतां मी काय करू रे? मी आता मरणार!" हत्ती घाबरून म्हणाला.

"महाराज! आपण माझी शेपटी पकडून तिच्या साहाय्याने बाहेर येण्याची खटपट करा," कोल्हा हसत हसत म्हणाला. "तुम्ही माझ्यासारख्या माणसावर विश्वास ठेवलात. आतां भोगा त्याची फळे!"

काही दिवसांनी तो हत्ती मरून गेला आणि त्या साऱ्या कोल्ह्यांची खाण्याची चंगळ झाली.

## गोष्ट ७ वी

# एका सिंहाची गोष्ट

फार पूर्वी, एका पर्वतामधील गुहेत एक सिंह रहात होता. भूक असो वा नसो, प्राणी मारणे हा त्याचा जणू एक छंदच होता!

एके दिवशी सर्व प्राणी जमले आणि सिंहाकडे जाऊन त्यांनी विनंती केली, "महाराज! निष्कारण प्राणी मारण्यात काय अर्थ आहे. आपण मान्य कराल तर दररोज एक प्राणी आम्ही आपल्याला देऊं.'

त्यावर विचार करून सिंह म्हणाला, "चालेल. मला मान्य आहे."

त्या दिवसापासून पुढे दररोज एकेक प्राणी आळीपाळीने सिंहाकडे जाऊ लागला.

एके दिवशी एका म्हाताऱ्या सशाची पाळी आली. अनिच्छेने तो हळुहळू सिंहाच्या गुहेकडे निघाला होता. सिंहाला मारण्यासाठी काय करावे, याचा रस्त्यातून जाता जाता विचार करीत तो मुद्दामच उशिरा पोहोचला.

" तू एवढ्या उशिरा कां आलास ? " सिंह रागाने गरजला. भुकेने तो जीभ चाटीत होता.

" महाराज, माझा काहीच दोष नाही. " ससा उत्तरला, " रस्त्यात मला जबरदस्तीने थांबावे लागले. दुसऱ्या एका सिंहाला मला खायचे होते. आपल्याला भेटल्यावर मी त्याच्याकडे परत जाईन अशी शपथ घेतल्यानंतरच त्याने मला आपल्याकडे यायची परवानगी दिली. "

" तो नीच कुठे आहे ते दाखव मला. मी त्याला ठार करीन. " सिंहाने गर्जना केली. तो रागाने नुसता थरथरत होता.

सशाने सिंहाला एका विहिरीवर नेले आणि त्याचे पाण्यातील प्रतिबिंब दाखवीत तो म्हणाला, " आपण स्वतःच पहावें महाराज. "

प्रतिबिंब दिसताच, सिंहाला वाटले हाच आपला शत्रू आहे. संतापाने तो डरकाळ्या फोडू लागला आणि त्याचा प्रतिध्वनी ऐकून, चिडून त्याने त्या सिंहाला मारण्यासाठी विहिरीत उडी घेतली अशा तऱ्हेने विहिरीत बुडून तो मरण पावला.

तात्पर्य : गर्व आणि अविवेकी वागणे यामुळे आपत्ती ओढवल्याशिवाय रहाणार नाही.

## गोष्ट ८ वी

# एक धनवान उंदीर व महंत यांची गोष्ट

कोणे एके काळी चंपक नावाच्या शहरात एक महंत रहात असे. तो भिक्षा मागून आपली उपजीविका करीत असे. तो रोज थोडेसे अन्न खाऊन बाकीचे आपल्या भिक्षापात्रात जपून ठेवीत असे.

एके दिवशी या महंताचा एक मित्र त्याला भेटायला आला. महंताने त्याचे स्वागत करून त्याला जेवायला दिले. नंतर ते दोघे काही खाजगी बोलणे करण्यासाठी आपल्या खोलीत गेले. पण त्या महंताला त्याच्याशी बोलत असताना मन एकाग्र करता येत नव्हते व तो एकसारखा जमिनीवर बांबूच्या छडीने आपटीत होता, एका उंदराला भेवडावण्यासाठी.

त्याच्या मित्राने हे पाहून त्याला विचारले: " तू हे काय चालविलं आहेस ! माझं म्हणणं नीट लक्ष देऊन ऐकत कां नाहीस ? "

" मला माफ कर हं ! पण तो पाहिलास दुष्ट उंदीर ? मी जे जे अन्न रोज जपून ठेवीत असतो ते तो रोज खात असतो. "

त्याचा मित्र त्या खुंटीकडे पाहू लागला व म्हणाला, " पण उंदराला इतकी उंच उडी कशी मारता येईल ? ह्यात त्याचा काही तरी हेतु असला पाहिजे. "

त्या महंताच्या मित्राने काही वेळ पावेतो विचार केला व मग तो म्हणाला, " हं ! त्याला फक्त एकच कारण असलें पाहिजे. त्यामुळे त्याच्या अंगात खूप शक्ति आलेली दिसते व म्हणून तो इतकी उंच उडी मारू शकतो. "

असा विचार विनिमय करून ते दोघे उंदराच्या बिळात लपवून

ठेवलेले अन्न शोधू लागले. अखेरीस त्यांना एक बीळ त्या खोलीच्या एका कोपऱ्यात आढळून आले, व त्यांनी ते खोदून काढले.

जेव्हां त्या उंदराला आपले सारे खाद्य नाहीसे झालेले आढळून आले, तेव्हां त्याला फार निराशा वाटली, त्याचा उत्साह नाहीसा झाला म्हणून तो जागचा हलेनासा झाला.

अशा तऱ्हेने त्या महंताचा त्रास वाचला व यापुढे आपल्या भिक्षा पात्रात जपून ठेवलेले अन्न सांभाळण्यासाठी खटपट करण्याची त्याला आवश्यकता वाटली नाहीं.

**तात्पर्य** : श्रीमंत पण पैशासाठी हपापलेली माणसे पैसा गमावून वर प्राणही गमावतील.

गोष्ट ९ वी

# एक धोबी, गाढव आणि कुत्रा यांची गोष्ट

कोणे एके काळी वाराणशी शहरात एक धोबी रहात असे.

एके रात्री त्याला गाढ झोप लागली असता, त्याच्या घरात एक चोर घुसला. हात.ला लागेल ते चोरण्याचा त्याचा उद्देश होता.

त्या धोब्याच्या घरापुढील अंगणात त्याचे गाढव आराम करीत पडले होते, आणि कुत्रा जवळच बसून होता. जेव्हा त्या गाढवाने चोराला घरात घुसताना पाहिले तेव्हा तो कुत्र्याला म्हणाला, "दोस्ता, हे काम तर तुझे आहे, मालकाला जागे करण्याचे."

"दोस्ता !" कुत्रा म्हणाला : "माझ्या कामाबद्दल तुला बोलायचें

काही कारण नाही. तुला माहीत आहेच की मी ह्या घराची राखण किती तरी वर्षांपासून करीत आलो आहे पण आपल्या मालकाला त्याची मुळीच पर्वा नाही. तो आताशा मला पोटभर अन्न खायला देत नाही. मग आता त्याचे काही का होईना मला त्याची पर्वा नाही."

"मूर्खा ऐक माझे म्हणणे!" ते गाढव खेंकाळले.

"ही तक्रार करण्याची वेळ नव्हे. ही वेळ आपले कर्तव्य करण्याची आहे! काही तरी कर! मालकाला जागे कर! हं आटप लवकर!"

"पण ज्या मालकाला, आपल्याला गरज लागली तरच आपल्या नोकराचाकरांची आठवण होते, तो मालक नीच समजला गेला पाहिजे!" कुत्र्याने उलट टोमणा मारला.

"अरे दुष्टबुद्धि बदमाष!" गाढव खेंकाळले. "असल्या आपत्तीच्या वेळी तू आपल्या कर्तव्याची हेळसांड करतो आहेस. बरं तर, मालकाला जागे करण्याचे तुझे काम मी पत्करतो."

असे म्हणून गाढव एवढ्या मोठ्याने खेंकाळू लागले की तो धोबी खाडकन् जागा झाला.

त्याबरोबर तो चोर लपून बसला. धोब्याने चोहोकडे हुडकून पाहिले. पण त्याला तो चोर दिसला नाही, तेव्हा त्याला एवढा राग आला की त्याने एक सोटा हातात घेतला, व बाहेर अंगणात येऊन तो त्या गरीब बिचाऱ्या गाढवाला झोडपू लागला.

अर्थात ते गाढव मरून गेले.

**तात्पर्य** : दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करण्यामुळे प्रसंगी प्राणावर बेतते.

ग्र. ग्रं.
२२ दा. क्र ९८५८८
दि. ....ता. नों

गोष्ट १० वी

## पाचर ओढून काढणाऱ्या माकडाची गोष्ट

कोणे एके काळी एका व्यापाऱ्याने आपल्या शहरात एक मंदिर बांधण्याचे ठरविले. हे बांधकाम चालू असता एका सुताराने एक लाकूड करवतीने अर्धे कापून त्या अर्ध्या कापलेल्या फळ्या पुनः एकत्र येऊ नयेत म्हणून, त्या चिरेत एक पाचर बसवून दिली व तो दुपारी आपल्या घरी निघून गेला.

अशा वेळी एक भटकणारा माकडांचा थवा त्या ठिकाणी येऊन पोहोचला व ती माकडे या लाकडाच्या अवतीभोवती उड्या मारून आपली करमणूक करू लागली.

आपले दोनही पाय त्या चिरेच्या फटीत ठेवून एक माकड ती पाचर उपटण्याचा उपद्व्याप करू लागले. आणि काय झाले पहा ! ती पाचर चटकन बाहेर आली व फळ्या एकदम मिटल्या व त्या माकडाचे पाय फटीत चिरडले गेले.

खूप वेदना होऊन ते उपद्व्यापी माकड मरून गेले.

तात्पर्य : नसती उठाठेव केल्याने जीव धोक्यात येतो.

गोष्ट ११ वी

## एक सिंह, उंदीर व मांजर यांची गोष्ट

एका डोंगराच्या गुहेत एक बलशाली सिंह रहात असे. जेव्हा जेव्हा तो झोपी जात असे तेव्हा तेव्हा एक उंदीर आपल्या बिळातून बाहेर पडून त्या सिंहाची आयाळ कुरतडत असे. सिंहाला हे समजल्यावर

त्याला भयंकर संताप आला. पण त्याला काही उपाय करणे शक्य झाले नाही, कारण तो सिंह त्याला पकडण्यासाठी उठतो तोंच तो उंदीर पार बिळात पळून जात असे.

त्या सिंहाने याविषयी खूप विचार करून अखेरीस एक युक्ती योजिली. त्याने पलीकडच्या खेड्यात जाऊन एक मांजर आपल्याबरोबर आणले. त्याने त्या मांजराला मांसाचे खूप तुकडे देऊन छान पोसले, आणि त्याला त्या गुहेत यथेच्छ संचार करण्याची मोकळीक दिली.

त्या उंदराने मांजराला पाहिल्यावर त्याला भयंकर भीति वाटली, आणि तो बिळाच्या बाहेर येईनासाच झाला. त्यामुळे सिंहाला शांतपणे झोप काढणे शक्य होऊ लागले. जेव्हा जेव्हा त्याला उंदीर बाहेर आल्याची चाहूल लागे तेव्हा तेव्हा तो सिंह मांजराला मांसाचे तुकडे खायला देत असे व आपण स्वस्थ झोपी जात असे.

याप्रमाणे बराच काळ गेला.

एकदा त्या उंदराला एवढी भूक लागली की तो आपला जीव धोक्यात टाकून थेट मांजराच्या देखत आपले खाद्य हुडकू लागला. मांजराने त्याला ताबडतोब पकडून ठार मारले.

उंदीर मरून गेला हे सिंहाला कळल्यावर तो मांजराला खाद्य देईनासा झाला. आपले अन्न शोधण्याचे काम त्याने मांजरावरच सोपवले.

गरीब बिचारे मांजर, काही कालानंतर अशक्त झाले व त्याला आपल्या धन्याच्या पालटलेल्या वर्तनाबद्दल फार वाईट वाटले.

तात्पर्य : गरज सरो नि वैद्य मरो.

## गोष्ट १२ वी

# टिटवी पक्षी आणि समुद्र यांची गोष्ट

एका समुद्राकाठी टिटवी पक्षांचे एक जोडपे—नर व मादी-रहात असे. कालांतराने मादी टिटवीला अंडी घालण्याची वेळ आली, म्हणून ती नराला म्हणाली, " प्रिया ! माझ्यासाठी एक योग्य व निवाऱ्याची जागा शोधून काढ बरे ! म्हणजे मी माझी अंडी तेथे घालू शकेन."

" प्रिये टिटवी ! अग हीच तर सुंदर निवाऱ्याची जागा आहे. " तो नर म्हणाला.

" मुळीच नाही ! " ती म्हणाली. " समुद्राला भरती आली म्हणजे ही जागा पाण्यात बुडून जाते. "

" तुला काय वाटलं ? मी इतका दुबळा आहे का की हा समुद्र येथे पाणी आणू शकेल ? " नर मोठ्याने गरजला.

" अहो महाराज ! " ती मादी टिटवी हसत म्हणाली, " अहो तुमच्यामध्ये व या समुद्रामध्ये खूप फरक आहे म्हटलं ! तुम्हाला आपलें दुबळेपण समजायला हव, नाहीतर उगाच दंड भोगावा लागेल म्हटलं ! "

पण तो नर पक्का हट्टी होता. त्या गरीब बिचाऱ्या मादी टिटवीने आपली अंडी त्याच ठिकाणी घातली.

समुद्राने हे त्यांचे मजेदार बोलणे ऐकले होते आणि त्याने पहिल्याच सपाट्याला ती अंडी वाहून नेली.

"अरे देवारे देवा!" ती मादी टिटवी दुःखाने रडू लागली, "आमच्यावर भयंकर आपत्ती ओढवली; आमची अंडी पार नाहीशी झाली."

"प्रिये टिटवी, तू काही काळजी करू नकोस." नर टिटवीने तिला धीर दिला.

त्या नर टिटवीने पक्ष्यांची सभा बोलाविली.

ते सारे आपला राजा गरुड याच्याकडे गेले आणि नर टिटवी सांगू लागला,

"महाराज! मी माझ्या जागी आजपर्यंत सुखासमाधानाने रहात असे आणि मी कोणालाही त्रास देत नसे, तरी सुद्धा ह्या महासागराने मला नि माझ्या बायकोला छळले आहे, आणि आमची अंडी वाहून नेऊन आमच्यावर त्याने आपत्ती ओढविली आहे." गरुड राजाने श्री विष्णूला ही सारी गोष्ट सांगितली—विष्णु म्हणजे सृष्टीचा सांभाळ करणारी देवता! भगवान विष्णूनी समुद्राला ती अंडी तावडतोब टिटवी नर मादीला परत करण्याची आज्ञा केली.

समुद्राला फार भीति वाटली व त्याने ती आज्ञा मानून ती अंडी परत दिली.

**तात्पर्य** : सामर्थ्याच्या जोरावर लहानावर अन्याय करता कामा नये. त्याची भरपाई करावीच लागते.

## गोष्ट १३ वी

# एक कावळ्याचे कुटुंब व काळा साप यांची गोष्ट

एका जंगलात एका भल्या मोठ्या झाडावर एक कावळ्याचे कुटुंब-नर व मादी—रहात असे.

त्या झाडाच्या पोकळीत एक काळा नाग पण रहात असे आणि तो कावळ्यांची पिल्ले खाऊन टाकीत असे.

एके दिवशी ती कावळी आपली अंडी घालायची वेळ आली असे पाहून आपल्या पतीला म्हणाली, " प्रिया ! आपण येथून निघून जाऊ या. माझी खात्री आहे की तो काळा नाग या खेपेलाही आपली पिल्ले खाऊन टाकील. "

" प्रिये ! अशी भिऊ नकोस, " तो नर कावळा म्हणाला.

" आता यापुढे मी त्याचा गुन्हा माफ करणार नाही. "

" पण तू त्याच्याशी कसा लढू शकशील ? तो तर फार बलवान आहे " ती म्हणाली.

" पण मी बुद्धिवान असल्यामुळे त्याच्या पेक्षा अधिक बलवान आहे. "

" मग मी काय करावं असें तुला वाटतं ? " त्या कावळीने विचारले.

" ह्या जवळच्याच तळ्यावर आपले राजेसाहेब रोज आंघोळीला येत असतात. आंघोळ करायच्या आधी ते आपला सोन्याचा हार येथेच तळ्याच्या काठी काढून ठेवीत असतात. तू तो हार आपल्या चोचीने उचल आणि तो काळा नाग रहात असलेल्या झाडाच्या पोकळीजवळ टाकून दे. तो हार घेण्यासाठी, राजाचे नोकर तुझ्या पाठोपाठ पळत येतील अर्थातच त्याना तो काळा नाग तेथे दिसेल आणि ते त्याला ठार मारतील. "

त्या कावळीने अगदी बरोबर तसे केले.

राजाच्या नोकरांनी कावळीचा पाठलाग केला आणि तिने मोठ्या

हुषारीने तो हार झाडाच्या पोकळीपाशी टाकून दिला. ते नोकर त्या जागी येताच त्यांना तो नाग दिसला व त्यांनी त्याला काठ्यानी ठार केले.

**तात्पर्य** : शक्तीपेक्षा युक्ती अधिक प्रभावी असते.

### गोष्ट १४ वी

## एक वानर, घंटा व एक शूर बाई यांची गोष्ट

कोणे एके काळी ब्रह्मपूर नावाच्या शहरात एक चोर रहात असे.

त्याने एके दिवशी तेथील देवळातील घंटा चोरली व ती घेऊन तो एका जंगलात पळून गेला.

एका वाघाने त्या घंटेचा आवाज ऐकला. त्यामुळे त्याचे लक्ष तिकडे वेधले गेले. त्याने त्या चोराला पाहिल्यावर त्याच्यावर झडप टाकली आणि त्याला ठार मारून टाकले. त्याबरोबर ती घंटा जमिनीवर आदळली.

काही दिवसानंतर माकडांच्या एका कळपाने ती घंटा पाहिली. त्यांनी ती उचलली व ती वाजविण्यास सुरुवात केली.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्या मेलेल्या चोराचे शरीर तेथील शहरातील लोकांना सापडले. ते मोठ्याने ओरडून म्हणाले, “कोणी तरी पिशाच्च माणसांना मारून टाकून ती घंटा वाजवीत असले पाहिजे.”

हे ऐकल्यावर घाबरून शहरातील लोक शहर सोडून भराभर बाहेर निघून जाऊ लागले.

पण एक बुद्धिवान बाई–ती शूर पण होती–स्वतःशी विचार करू लागली, "माझी खात्री आहे की ही घंटा तेथील माकडेच वाजवीत असली पाहिजेत." म्हणून ती धैर्याने त्या जंगलात गेली व तिला आढळून आले की तिचा अंदाज बरोबर होता.

नंतर ती तेथील राजाकडे जाऊन सांगू लागली : "महाराज ! माझी खात्री आहे की मी त्या पिशाच्चाचा बंदोबस्त करू शकेन. त्यासाठी आपल्याला ईश्वराची आराधना करावी लागेल. पण त्याच्यासाठी खूप पैसा खर्च करावा लागेल."

राजाने अत्यंत खुषीने तिला खूप पैसा देऊन टाकला.

त्या बाईने ईश्वराच्या आराधनेचे खूप स्तोम माजविले. तिने जमिनीवर एक भलेमोठे वर्तुळ काढले. त्यामध्ये काही फळे व पाने ठेविली आणि अशा तयारीने गणेश देवतेची आराधना करण्यास तिने आरंभ केला. मग ती फळे व पाने घेऊन ती जंगलात गेली.

तिने ती फळे एका झाडाखाली ठेविली आणि ती जवळच बसली. त्या अधाशी माकडांनी ती रसरशीत फळे पाहिल्यावर घंटा टाकून दिली व फळांवर ताव मारण्यास सुरुवात केली. त्या बाईने चटकन् घंटा उचलली आणि ती राजाकडे धावतच गेली.

राजाला ती घंटा पाहून फार आनंद झाला व तेव्हापासून ती बाई लोकांच्या आदराला प्राप्त झाली.

**तात्पर्य** : ऐकीव वदंतांवर विश्वास न ठेवता माणसाने प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाऊन शोध केला पाहिजे.

८०६०७ श्री.दी.
३८२६ ६/१/८३

### गोष्ट १५ वी

# पक्षी व थंडीत कुडकुडणारी माकडे यांची गोष्ट

नर्मदा नदीकाठी एक मोठे झाड होते.

पक्षी झाडाच्या ढोलीत घरटी बांधून सुखाने रहात असत.

एके दिवशी पावसाळ्यात मेघांनी भरलेल्या आकाशातून मुसळधार पाऊस पडला.

त्यावेळी इतस्ततः भटकणारी काही माकडे पावसात चिंब भिजली आणि निवाऱ्यासाठी झाडाखाली आली. थंडीने कुडकुडणाऱ्या त्या माकडांची अगदी दयनीय अवस्था झाली.

हे पाहून त्या पक्ष्यांना माकडांची दया आली. ते माकडांना म्हणाले, " माकडांनो ! आम्ही आमच्या चोचीतून झाडाच्या फांद्या, गवताची पाती आणून आमची घरटी बनवितो. आणि तुम्हाला हातपाय असून काय ही तुमची दयनीय अवस्था ! तुम्ही तुमच्याकरिता छानशी घरे का उभारीत नाही ? "

माकडांनी जेव्हा हे ऐकले तेव्हा ती चवताळून स्वतःशीच म्हणाली, " घरट्यांमुळे या पक्ष्यांना पावसापाण्याची आणि थंडी-वाऱ्याची भीती नाही. म्हणून आता ते आपल्याबद्दल चिकित्सा करीत बसले आहेत. हा पाऊस थांबू दे ! मग आपण त्यांचा समाचार घेऊ. "

काही वेळाने पाऊस थांबल्यानंतर, माकडे झाडावर चढली आणि त्यांनी पक्ष्यांची अंडी व घरटी उध्वस्त केला.

मग पक्ष्यांना त्यांची चूक कळून आली. ' अनोळखी व्यक्तींना कधीही सल्ला देऊ नये ' त्यांनी स्वतःशीच म्हटले.

गोष्ट १६ वी

# धोबी व एक दुर्दैवी गाढव यांची गोष्ट

हस्तिनापुरात विलास नावाचा एक धोबी रहात होता. त्याच्या जवळ एक गाढव होते. रोज रोज खूप ओझी वाहून ते अगदी मरायला टेकले होते.

एके दिवशी त्या धोब्याने, त्याच्या अंगावर वाघाचे कातडे बांधून त्याला एका जवळच्या मळ्यात सोडून दिले.

त्या मळ्याच्या मालकाला तो वाघ आहे असे वाटले व तो घाबरून तेथून पळून गेला.

काही दिवसांनी त्या मळ्याची देखरेख करणाऱ्या मालकाने एक पांढुरके कापड अंगावर पांघरून, हातात धनुष्य बाण घेतला व ह्या वाघाची वाट पहात तो तेथेच लपून बसला.

आतां ते वाघाचे कातडे पांघरलेले गाढव रोज रोज त्या मळ्यात खूप चरून चांगले गलेलठ्ठ झाले होते. मळ्यात हिंडताना त्याला लांबून एक पांढऱ्या रंगाचा प्राणी दिसला. तेही एक गाढव आहे असे वाटून हे गाढव मोठमोठ्याने खेकाळू लागले, व थेट त्या गाढवाकडे धावले.

आतां त्या मळेवाल्याला कळून चुकले की हा वाघ नसून वाघाचे कातडें पांघरलेले एक गाढव आहे. त्याला त्याने बाण मारून तावडतोब ठार केले. ढोंगी माणूस आपल्याच करणीने मरतो.

## गोष्ट १७ वी

# ससे व हत्तींचा एक कळप यांची गोष्ट

कोणे एके काळी एका रानात हत्तींचा एक मोठा कळप रहात होता. ते हत्ती जवळच्याच तळ्यावर जाऊन खूप पाणी पिऊन आपली तहान भागवीत असत, व यथेच्छ आंघोळही करीत असत.

एकदा ऐन पावसाळ्यात पावसाचा एक थेंबही तेथे पडला नाही. हत्तींना तर खूप तहान लागायची आणि तळ्यात तर एक थेंबही नव्हता. म्हणून तहानेने व्याकुळ झालेले हे हत्ती आपल्या राजाकडे जाऊन सांगू लागले: " महाराज ! आम्ही तहानेने अगदी व्याकुळ झालो आहोत. आम्हाला पाण्याशिवाय जिवंत तरी कसे रहाता येईल. काय करावे, कोठे जावे काही सुचत नाही आम्हाला."

त्या हत्तींच्या राजाने त्यांना जवळच्याच एका स्वच्छ, पाण्याने भरलेल्या खोल तळ्यापाशी नेले.

दिवसामागून दिवस जात होते. पण जेव्हा जेव्हा हे हत्ती पाणी पिण्यासाठी तळ्यावर जात तेव्हा तेव्हा त्याच्या पायाखाली काही ससे चिरडले जात.

हे पाहिल्यावर एका सशाला वाटले, " असे जर आम्ही ह्या हत्तींच्या पायाखाली रोजरोज चिरडले जाऊ लागलो तर आमचा सारा वंशच खलास होईल.'

हे पाहिल्यावर त्यांच्यापैकी एक वृद्ध ससा–त्याचे नांव विजय असे होते–म्हणाला, " बाबानो ! तुम्ही बिलकुल काळजी करू नका. ह्या हत्तींना टाळण्यासाठी मी एक युक्ति योजून ठेवतो."

अशा तऱ्हेने वचन देऊन तो वृद्ध ससा तेथून निघाला. " ह्या हत्तींना भेटल्यावर त्यांना मी काय सांगावें बरें ? मला अगदी त्यांच्या जवळ जाता येणार नाही, नाहीतर ते मला मारून टाकतील. म्हणून मी ह्या डोंगराच्या टोकावर बसून ह्या हत्तींना उद्देशून बोलेन. "

तो ससा डोंगराच्या टोकावरून हत्तींच्या राजाशी बोलू लागला.

राजाने विचारले, " कोण आहेस तू ? आणि कोठून आलास तू ? "

" मी चंद्रराजाचा दूत आहे. त्यानेच मला तुमच्याकडे धाडले आहे "

" तुझ्या भेटीचं कारण काय ? " हत्तींच्या राजाने विचारले.

" प्राणावर बेतली तरी राजाचा दूत नेहमी खरेच बोलणार, म्हणून मी तुमच्याशी आमच्या चंद्रराजाच्या आज्ञेनं बोलत आहे. ' येथे रहणारे सारे ससे मी या तळ्याच्या रक्षणाकरिता येथे ठेवले आहेत. त्यांना तुम्ही पायाखाली तुडविता व त्यांना येथून हाकून देता. त्यांना ठार मारून तुम्ही त्यांचा मोठा अपराध केला आहे. मी त्यांचा पुरातन काळापासून रक्षक आहे म्हणून जरा सांभाळून रहा ! '

त्या म्हाताऱ्या विजय नावाच्या सशाने असे म्हटल्यावर तो हत्तीराजा घाबरून म्हणाला " हे सारे आमच्या अज्ञानाने घडले. आता असे पुनः होणार नाही. "

" बरं ! हे जर खरं असेल तर तुम्ही ह्या तळ्यात संतापानं थरथरणाऱ्या चंद्रराजाला नमस्कार करा नि येथून जा ! "

रात्रीच्या वेळी त्या वृद्ध सशाने हत्तींच्या राजाला तळ्याकडे नेले. हत्तींच्या राजाने चंद्राचे पाण्यावर थरथरणारे प्रतिबिंब पाहिले.

ते पाहिल्यावर चंद्रराजा आपल्यावर खरोखरीच रागावला आहे अशी त्याची खात्री झाली व त्याने चंद्राला लवून भीतमीतच नमस्कार केला.

तेव्हा तो वृद्ध ससा चंद्राला उद्देशून म्हणाला. " हे चंद्रराजा ह्या हत्तींच्या राजाने अज्ञानामुळे आपला सारा कळप ह्या तळ्यावर आणला, ही त्याची चूक त्याला आता कळली. तो आता आपला सारा कळप येथून दुसरीकडे नेणार आहे त्याला आपण उदार अंतःकरणाने क्षमा करावी तो आताच्या आताच सारा कळप येथून घेऊन जाणार आहे व तो पुनः फिरकणार सुद्धा नाही."

त्या वृद्ध सशाचे बोलणे संपल्याबरोबर हत्तींच्या राजाने आपला सारा कळप येथून हलविला. सारे ससे खूष झाले व त्यांनी वृद्ध सशाचे आभार मानले.

**तात्पर्य** : एकादा दुबळा माणूसही आपल्या अक्कलहुषारीने बलवानाला चीत करू शकतो.

---

## गोष्ट १८ वी

# एक दयाळू हंस व एक दुष्ट कावळा यांची गोष्ट

उज्जयिनी शहराच्या बाहेर एक भले मोठे वडाचे झाड होते. ह्या झाडावर एक हंस व एक कावळा रहात होता.

उन्हाळ्यातील गरम हवेत एक प्रवासी तेथील रस्त्यावरून चालत होता. अत्यंत गरम असलेल्या उन्हात चालून तो खूप थकला होता. ह्या झाडाच्या थंड छायेत आराम करण्यासाठी थांबत त्याने आपले धनुष्यबाण आपल्या जवळच ठेवले व तो झोपी गेला.

काही वेळाने त्या झाडाखालील सावली नाहीशी झाली व त्याच्या तोंडावर ऊन पडू लागले.

त्या प्रेमळ अंतःकरणाच्या हंसाने ते पाहिले तेव्हा त्याने आपले भले मोठे पंख पसरून त्या गाढ झोपी गेलेल्या प्रवाशाच्या तोंडावर पुनः सावली केली.

तो दुष्ट कावळा हे सारे बसून पहात होता. त्याला त्या हंसाचा दयाळूपणा आवडला नाही. तो त्याचा सूड घेण्याचा विचार करीत असता तो प्रवासी जागा झाला व त्याने तोंड उघडून मोठ्याने जांभई दिली. त्याबरोबर त्या दुष्ट कावळ्याने त्या हंसाचा सूड उगविण्यासाठी प्रवाशाच्या आ वासलेल्या तोंडात आपली विष्ठा टाकली व तेथून तो उडून गेला.

त्याबरोबर ह्या हंसानेच ही घाण आपल्या तोंडात टाकली असली पाहिजे अशी कल्पना करून प्रवाशाने बाण मारून त्या हंसाला ठार केले.

**तात्पर्य** : दुष्ट माणसाच्या संगतीत सज्जन माणसाला उगाच दुःख भोगावे लागते.

## गोष्ट १९ वी

# एक लबाड कावळा व मूर्ख लावी पक्षी यांची गोष्ट

कोणे एके काळी सर्व पक्ष्यांचा राजा गरुड याचा समुद्रकाठी महोत्सव साजरा होत होता. सर्व पक्षी तेथे गोळा झाले होते, समुद्रकाठच्या यात्रेसाठी.

त्यांच्या बरोबर एक कावळाही गेला होता, व त्याचा एक मित्र लावी पक्षीही त्याच्याबरोबर होता.

वाटेने जाता जाता त्या कावळ्याने व लावी पक्षीने डोक्यावर भरलेली दह्याची हंडी घेऊन आपल्या पुढे जात असलेल्या एका गवळ्याला पाहिले.

आपल्या स्वभावानुसार त्या दुष्ट कावळ्याने त्या दह्याच्या उघड्या हंडीत आपली चोच घुसडून दही खाण्याचा सपाटा चालविला व अशा तऱ्हेने दह्याची लूट होऊ लागली.

त्या गवळ्याने हे काय चालले आहे हे पाहिल्यावर तो पुढे जायचा थांबला, आपली हंडी जमिनीवर ठेवून तो सभोवार पाहू लागला. एक कावळा व एक लावी पक्षी आपल्या डोक्यावर उडत असल्याचे त्याला दिसले.

त्याबरोबर तो कावळा खूप घाबरला व जोराने उडून गेला. पण तो मूर्ख लावी पक्षी तेथेच घुटमळत होता. कारण त्याला जोराने उडता येत नव्हते. त्याला त्या गवळ्याने पकडून ठार मारले.

**तात्पर्य** : लबाड लोक आपले मरण टाळतात पण निरपराधी मात्र उगीच प्राणास मुकतात.

## गोष्ट २० वी

# नीळीच्या भांड्यात पडलेल्या कोल्ह्याची गोष्ट

कोणे एके काळी एक कोल्हा खाद्य हुडकण्यासाठी भटकत असता गावाबाहेरच्या नीळीने भरलेल्या एका लाकडी भांड्यात पडला. त्याने त्यातून बाहेर पडण्याची खूप खटपट केली पण सारे व्यर्थ.

सकाळी जवळ येत असलेल्या रंगाऱ्याची पावले वाजलेली ऐकल्याबरोबर मेल्याचे ढोंग करून तो तेथेच पडून राहिला. म्हणून त्या रंगाऱ्याने त्याला बाहेर काढून जमिनीवर फेकून दिले.

त्या रंगाऱ्याने त्याला बाहेर फेकल्याबरोबर तो कोल्हा चटकन उठून उभा राहिला व त्याने जंगलाच्या दिशेने धूम ठोकली.

आपण सुंदर निळ्या रंगाने माखले गेले आहोत असे पाहिल्यावर त्याने स्वतःशी विचार केला. "आता माझ्या अंगावर सुंदर रंग चढला आहे. मी आतां इतरांपेक्षा निराळा दिसू लागलो आहे. मग मी याचा फायदा कां उठवू नये?"

अशा तऱ्हेने विचार करीत त्याने इतर साऱ्या कोल्ह्यांना आमंत्रण दिले आणि त्यांना तो सांगू लागला. "या वनातील देवतेने स्वतः आपल्या हाताने माझ्या अंगावर हा रंग माखून माझी पूजा केली. पहा, पहा तर खरा हा माझा रंग! म्हणून मी आजपासून या जंगलाचा राजा झालो आहे आणि तुम्ही सर्वांनी माझी आज्ञा पाळली पाहिजे."

त्या कोल्ह्यानी त्याच्या चमत्कारिक रंगाकडे नीट पाहिले तेव्हां त्यांना त्याचा मोठा दरारा वाटला, म्हणून त्यांनी त्याला लवून नमस्कार केला आणि ते म्हणाले, "महाराज राजराजेश्वर जसा हुकूम फर्मावतील तसे आम्ही वागू!"

काही काळ गेल्यावर तेथील सिंह व वाघही त्याची आज्ञा पाळू लागले. त्यामुळे त्या रंगलेल्या कोल्ह्याला आणखीच गर्व झाला. त्यामुळे तो आता अत्यंत उद्धटपणाने सर्वांशी वागू लागला व आपल्या नोकरवर्गातील कोल्हे त्याला मुळीच आवडेनासे झाले.

सारे कोल्हे आता अत्यंत दुःखी झाले होते हे एका म्हाताऱ्या कोल्ह्याने पाहिले. तेव्हा तो त्यांना म्हणाला, "बाबांनो, असे कष्टी

होऊ नका. आम्ही सारे अत्यंत चलाख आहोत तरी आमच्याचपैकी ह्या एका कोल्ह्याने आमचा अपमान केला आहे. तुम्ही आता पहाच. ह्याचे पाप ह्याच्या अंगाशी येईल ! सिंह, वाघ व इतर जनावरे यांना हा एक साधा कोल्हा आहे हे समजत नाही म्हणून त्यांनी आपला राजा म्हणून त्याचा स्वीकार केला आहे. आपण आतां अशी युक्ती योजिली पाहिजे की हे त्याचे बिंग ताबडतोब उघडकीला येईल—तो राजा नसून आपल्याचसारखा एक साधा कोल्हा आहे हे सर्वांना कळून येईल. म्हणून आपण सारेजण आज संध्याकाळी एकत्र येऊन मोठ्याने कोल्हेकुई करायला सुरवात करू या."

संध्याकाळ झाल्याबरोबर सारे कोल्हे एकत्र जमले व त्यांनी एकदम अशी कर्कश कोल्हेकुई सुरू केली की त्याबरोबर स्वाभाविकपणेच आपल्या गुणधर्माप्रमाणे हा निळा कोल्हाही कुई कुई करून मोठमोठ्याने ओरडू लागला.

त्याबरोबर सिंह, वाघ व इतर श्वापदांनी त्याच्यावर एकदम झडप टाकून त्याचा प्राण घेतला.

तेव्हा तो म्हातारा कोल्हा म्हणाला, " लोकांना गप्पा मारून फसविणारा इसम अखेरीस उघडा पडेल व प्राणास मुकेल. "

## गोष्ट २१ वी

# दोन हंस पक्षी व एक कासव यांची गोष्ट

फार प्राचीन काळी मगध देशामध्ये एका तळ्यात एक कासव होते. तेथे जवळच दोन हंसही ते रहात होते. ह्या तिघांचीही खूप मैत्री होती.

एके दिवशी काही कोळी त्या ठिकाणी आले आणि म्हणाले.

"उद्या सकाळी येथे येऊन आम्ही मासे व कासव पकडणार आहोत." हे ऐकल्याबरोबर कासव आपल्या हंस मित्रांना म्हणाले: "हे ऐकलंत का हे कोळी आता काय म्हणत होते ते ?"

"आता आपल्याला सुखरूपपणे येथून जाण्याचा उत्तम उपाय शोधून काढला पाहिजे." ते हंस म्हणाले.

"ह्या तळ्यात आपल्यावर आतापर्यंत अनेक आपत्ती ओढवल्या आहेत. म्हणून दुसऱ्या तळ्याकडे आजच्या आज जाण्यासाठी तुम्ही मला मदत करा !" कासवाने विनवणी केली.

"पण तू असा सरपटत जमिनीवरून त्या तळ्याकडे जाणार, मग तुझ्या सुखरूपपणाची काय खात्री देता येईल ?" हंसांनी विचारले.

"तुम्ही आकाशातून उडत जाल तेव्हा मलाही तुमच्याबरोबर आकाशातून नेण्याची एखादी युक्ती शोधाना !" कासव मोठ्या खुषीने म्हणाले.

"अरे पण हे कसं शक्य होईल ?" हंसांनी विचारले.

"तुम्ही असं करा," कासव सांगू लागले. "एक काठी तुम्ही दोघांनी आपापल्या चोचीत धरा आणि मी माझ्या दातांनी ती मधे घट्ट धरून ठेवतो, म्हणजे तुमच्याबरोबर मलाही चटकन येथून उडून जाता येईल."

"होय, ही युक्ती छान आहे. पण मधेच एखादा अपघात होण्याचाही संभव आहे कारण बोलायला तू तोंड उघडलेस की खाली आपटशील तू." हंस म्हणाले.

"मी काय इतका मूर्ख आहे होय ?" कासवाने टोमणा दिला.

पुढे जेव्हा हे हंस आकाशातून निघाले तेव्हा त्यांच्या तोंडात काठी व मध्ये कासव हा विचित्र प्रकार पाहून खालच्या कोळ्यांना आश्चर्य वाटले. तेव्हा ते मोठमोठ्याने ओरडू लागले. "अरे बघा, बघा, काय विलक्षण प्रकार आहे हा! हे हंसपक्षी एका कासवाला बरोबर घेऊन उडत चालले आहेत."

"आणि जर ते कासव खाली पडले तर आम्ही ते भाजून खाऊ." एक कोळी म्हणाला.

"मी तर त्याला आपल्या घरी घेऊन जाऊन त्याची खांडोळी करीन व खाऊन टाकीन!"

हे दुष्ट शब्द ऐकून कासव आपण दिलेले वचन विसरून गेले. आणि संतापाने म्हणाले: "तुम्हाला नुसती राख खावी लागेल."

त्याने बोलण्यासाठी आपले तोंड उघडल्याबरोबर त्याची पकड सुटली आणि ते खाली कोसळले, आणि कोळ्यांनी त्याला ठार मारले.

त्या हंसाना अतिशय दुःख झाले की आपला मित्र अशा तऱ्हेने मरण पावला.

"पण ह्या कासवाने आपले वचन पाळले असते तर असा प्रसंग ओढवला नसता."

**तात्पर्य** : जो कोणा आपल्या मित्राच्या उपदेशाकडे लक्ष देत नाही, त्याचा असाच अंत होणार.

## गोष्ट २२ वी

# तीन माशांची गोष्ट

फार पूर्वी, एका तळ्यात तीन मासे रहात होते. एके दिवशी दोन कोळी या तळ्यावरून जात होते. जाता जाता एक कोळी दुसऱ्या कोळ्याला म्हणाला, "उद्या सकाळी इथे येऊन आपण सर्व मासे पकडू या."

हे ऐकल्याबरोबर एक मासा म्हणाला, "मी आपला दुसऱ्या तळ्यामध्ये जाईन." आणि असे म्हणून तो निघून गेला.

दुसरा मासा म्हणाला, "उद्या काय घडेल कोणी सांगावं? त्यापेक्षा संकट येताच मी निर्धारानं त्याला सामोरा जाईन."

"कशाला उगाच चिंता करायची? जे घडायचं असेल ते घडणारच!" तिसरा मासा उत्तरला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते कोळी तळ्याकाठी आले आणि मासे-मारीसाठी त्यांनी तळ्यात जाळे फेकले.

दुसरा मासा जाळ्यात सापडला. परंतु त्याने मेल्याचे ढोंग केले. त्याला उचलून घेण्यासाठी जेव्हा जाळ्याबाहेर काढण्यात आले तेव्हा सर्वशक्तिनिशी त्याने पाण्यात उडी मारली. आणि अशा तऱ्हेने सुरक्षितपणे तो पोहत निघून गेला.

तिसरा मासा जाळ्यात सापडताच कोळ्यांनी त्याला पकडून ठार मारले.

कोळी निघून गेल्याचे पहाताच दुसऱ्या माशाला फार आनंद झाला. स्वतःशीच तो म्हणाला, " प्रत्येक गोष्ट नशिबावर सोपविण्यात अर्थ नाही. जेव्हा संकट येतें तेव्हा त्याला सामोरे जाऊनच त्याचा सामना केला पाहिजे "

## गोष्ट २३ वी

# मूर्ख बगळा, काळा साप आणि मुंगूस यांची गोष्ट

उत्तरेकडील पर्वताजवळ, अमरावती नदीच्या काठी, बगळ्यांचे एक जोडपे अंजिराच्या झाडावर रहात होते. याच झाडाच्या बुंध्याच्या एका ढोलीमध्ये एक काळा साप रहात होता. झाडावर चढून बगळ्यांची पिले खाऊन तो आपला उदरनिर्वाह करीत असे.

एकदा अशीच ती बगळी आपली पिले सापाने खाल्ल्यामुळे आक्रोश करीत बसली होती. तिचा आक्रोश ऐकून शेजारच्या झाडावर रहाणाऱ्या बगळ्यांमधील एक बगळा तिला म्हणाला, " सापापासून सुटका करून घेण्यासाठी मी तुला काय करायचं ते सांगतो. " ढोलीजवळच मुंगुसाचे बीळ आहे. मुंगुसाला मासे फार आवडतात. तेव्हा तू सापाच्या ढोलीपासून मुंगुसाच्या बिळापर्यंत माशाचे तुकडे टाक. माशाच्या लोभाने मुंगूस मासे खात खात ढोलीपर्यंत पोचेल, आणि तेथे सापाला बघून ते सापाला नक्कीच मारील. कारण त्या दोघांचे हाडवैर आहे. "

हा सल्ला ऐकून बगळीने त्याप्रमाणे केले.

साप दिसताच मुंगुसाने त्याच्यावर झडप घालून त्याला ठार केले.

नंतर मुंगुसाने जेव्हां झाडावर बगळयाच्या पिलांचे ओरडणे ऐकले तेव्हा तो झाडावर चढला आणि त्याने सर्व पिले खाऊन टाकली.

हे पाहून, अविचाराने आपण सल्ला दिल्याबद्दल शेजारच्या झाडावरील बगळयाला फार वाईट वाटले.

" एखादी योजना आखतांना तिच्या परिणामांचाही पूर्ण विचार केला पाहिजे. " तो स्वतःशीच म्हणाला.

## गोष्ट २४ वी

# एक महंत व उंदीर यांची गोष्ट

फार प्राचीन काळी, एका झोपडीमधे एक महंत रहात होता.

एकदा तो रस्त्याने जात असता, एका कावळयाने आपल्या पंजात एक उंदीर धरलेला त्याने पाहिला. उडता उडता तो उंदीर त्याच्या पंजातून निसटला आणि महंताच्यापुढेच येऊन पडला. त्याने दयाळूपणे त्या उंदराला उचलले आणि आपल्या झोपडीत आणले. त्याला भात खाऊ घातला.

हळुहळू तो उंदीर सुधारला व झोपडीबाहेर हिंडू फिरू लागला. महंत त्याच्यावर प्रेम करू लागला. एके दिवशी तो उंदीर झोपडीबाहेर हिंडत असता एका मांजराने त्याला पाहिले व त्याचा पाठलाग सुरू केला. आपला लाडका उंदीर हे मांजर मारणार हे पाहून तो साधुपुरुष फार अस्वस्थ झाला.

अखेर आपल्या तपःसामर्थ्याने त्याने उंदराला मांजराचे रूप प्राप्त करून दिले. दुसऱ्या मांजरांपासून त्याला स्वतःचे रक्षण करता यावे हा त्यामागे उद्देश होता.

काही वेळाने तेथे एक कुत्रा आला. त्याने या मांजरावर भुंकायला सुरुवात केली व पाठलाग सुरू केला. हे पाहून त्या साधुपुरुषाने मांजराचे रूपांतर कुत्र्यामध्ये केले.

आता कुत्र्याला वाघाची भीती निर्माण झाली. तेव्हा साधुपुरुषाने आपल्या तपाच्या बळावर कुत्र्याला वाघाचे रूप दिले. अशा तऱ्हेने दरवेळी बचाव करण्यासाठी त्याने त्याला वेगवेगळी रूपे दिली तरी साधूच्या मनात त्याचा छोटा उंदीरच होता.

मात्र लोक येता-जाता त्या वाघाकडे पाहून म्हणायचे, "हा काही खरा वाघ नव्हे. हा तर उंदीर आहे, की ज्याला संरक्षणासाठी साधूने वाघामध्ये रूपांतरित केला आहे. तो काही आपल्याला खाऊ शकणार नाही."

हे ऐकून उंदराला फार राग यायचा. "जोपर्यंत हा साधू जिवंत आहे. तोपर्यंत माझे सत्य रूप लपून रहाणार नाही. या साधूपासून मला माझी सुटका करून घेतलीच पाहिजे." असा विचार करून त्या वाघाने साधूला ठार मारण्याचा बेत केला.

परंतु वाघाला जवळ येतांना पाहून, अंतर्ज्ञानाने साधूने त्याचा विचार ओळखला व रागाने त्याने शापवाणी उच्चारली "तुझ्या पहिल्या स्वरूपात जा."

त्याने शापवाणी उच्चारताच वाघाचे रूप अंतर्धान पावून त्याला पुन्हा उंदराचे स्वरूप प्राप्त झाले.

साधूला त्याची कणव आली. आणि तो स्वतःशीच म्हणाला, "एकाद्या कनिष्ठ व्यक्तीला जर श्रेष्ठ पदावर पोहोचविले तर परिणामी अनर्थ ओढवतो."

---

गोष्ट २५ वी

# लोभी करकोचा व हुषार खेकडा यांची गोष्ट

फार फार वर्षांपूर्वी माळवा देशाजवळच्या एका तळ्यात एक म्हातारा करकोचा रहात होता. तो इतका अशक्त झाला होता की, मासे पकडायला जाण्याचेही त्याच्यात त्राण उरले नव्हते.

विनासायास मासे व खेकडे भक्ष्यार्थ मिळविण्यासाठी त्याने एक शक्कल शोधून काढली.

एके दिवशी निर्जीव व उदास होऊन तो तळ्याकाठी उभा राहिला.

उदासपणे उभ्या असलेल्या करकोच्याला पाहून एका खेकड्याने त्याला विचारले, "मासे न पकडता तू तेथे नुसताच कां उभा राहिला आहेस?"

"प्रिय मित्रा, नगराच्या बाहेर एक भयंकर बातमी मला ऐकायला मिळाली आहे. मासे हे तर माझे भक्ष्य आहे. आणि उद्या सकाळी काही कोळी येऊन या तळ्यातले सर्व मासे पकडणार आहेत. माशांखेरीज मी जगूच शकणार नाही. त्यामुळे हे ऐकून माझी वासनाच उडाली आहे. मला काहीच खावंसे वाटत नाही."

ही धोक्याची वार्ता कळताच माशांनी एकमेकांशी सल्लामसलत सुरू केली. 'करकोचा जरी आपला शत्रू असला तरी आपल्या या संकटात

तो नक्कीच मदत करील. तेव्हां काय करावं याबद्दल त्याचाच सल्ला घ्यावा.' असे सर्वानुमते ठरले.

सर्वांनी करकोच्याकडे धाव घेतली. "जिवंत रहाण्यासाठी आम्ही काय करावं हे कृपा करून सांगा."

त्यांच्या प्रश्नावर विचार करण्याचा करकोच्याने बहाणा केला. परंतु आपला डाव यशस्वी झाल्याचे पाहून तो मनोमन खूष झाला. "यावर एक उपाय आहे. तुम्हाला एकेकाला उचलून मी जवळच्या दुसऱ्या एका तळ्यात नेऊन सोडीन."

मृत्यूपासून आपली सुटका झाल्याचे पाहून माशांनी करकोच्याची योजना मान्य केली.

दररोज एकेका माशाला आपल्या पाठीवरून करकोचा तळ्याजवळच असलेल्या एका ठिकाणी न्यायचा आणि झाडाखाली बसून खाऊन टाकायचा. अशा तऱ्हेने कोणताही त्रास न घेता रोज मासे खाण्याचे सुख त्याने काही दिवस उपभोगले.

एके दिवशी तो खेकडा त्याला म्हणाला, "मलाही तेथे घेऊन चल."

करकोच्याने ताबडतोब त्याची विनंती मान्य केली. तो मनाशी म्हणाला, "फारच उत्तम, बदल म्हणून ह्याचं मांस चाखायला मिळेल."

दुसऱ्या दिवशी, करकोच्याने झाडाखाली ज्याठिकाणी त्याला पाठीवरून नेले, त्या ठिकाणी माशांच्या हाडांचा ढीग पडला होता. क्षणार्धात खेकड्याच्या डोक्यात प्रकाश पडला आणि आतापर्यंत करकोच्याने काय केले ते त्याने ओळखले. त्याने एक दीर्घ उसासा सोडून स्वतःशी म्हटले, "अरेरे! मी किती दुर्दैवी! मी आता नक्कीच मरणार, परंतु मला धीटपणे मृत्युला सामोरे गेले पाहिजे."

असा विचार करून, हळुहळू करकोच्याच्या पाठीवरून सरकत सरकत खेकडा त्याच्या मानेपर्यंत पोहोचला आणि खेकड्याने त्याला कडकडून चावा घेतला. करकोच्याची मान तुटून तो मृत्यू पावला.

" तुझ्या दुष्कृत्यापासून तुझी सुटका नाही. एक ना एक दिवस ती तुझा बळी घेतल्याशिवाय रहाणार नाहीत." खेकडा म्हणाला.

## गोष्ट २६ वी

# भोळा ब्राह्मण व तीन दगलबाज यांची गोष्ट

कोणे एके काळी गौतमारण्यात एका गावात एक भोळा ब्राह्मण रहात असे. त्याने यज्ञ करण्याचे ठरविले होते. म्हणून त्याने शेजारच्या खेड्यातून एक गलेलठ्ठ बोकड खरेदी केला होता, व त्याला आपल्या खांद्यावर घेऊन तो आपल्या गावी परत निघाला होता. रस्ता जंगलातून होता.

वाटेने जाता जाता तिघा दगलबाजांनी त्याला पाहिले.

त्याच्या खांद्यावर एक लठ्ठ बोकड आहे हे पाहिल्यावर ते आपापसात म्हणाले, " आपण हा बोकड कसा पळवावा बरं ? त्याचं किती सुंदर खाद्य बनेल ! "

त्यांनी विचार करून एक युक्ती योजिली.

त्या भोळ्या ब्राह्मणाला न दिसता ते त्या रानातून पळून गेले व त्याच्या घरच्या वाटेवर एकमेकापासून काही अंतरावर जाऊन उभे राहिले.

तो भोळा ब्राह्मण त्या पहिल्या दगलबाजाजवळ आल्याबरोबर त्याने लवून त्याला नमस्कार केला व आपला ब्राह्मणाविषयी असलेला आदर व्यक्त करण्याचे ढोंग केले. तो नम्रतेने म्हणाला: " पवित्र ब्राह्मणा! आपल्या खांद्यावरून तुम्ही हा कुत्रा कुठे घेऊन चाललात ? "

" कुत्रा ? " ब्राह्मण आश्चर्याने म्हणाला. " अरे हा तर बोकड आहे आणि मी तो ईश्वराच्या यज्ञासाठी घेऊन निघालो आहे माझ्या खांद्यावर."

तो भोळा ब्राह्मण इतके बोलून तसाच पुढे चालला असता त्य लबाड माणसाविषयी विचार करीत होता.

काही अंतरावर, आदराने ब्राह्मणाला लवून वंदन करीत आहोत असा बहाणा करून तो दुसरा दगलबाज म्हणाला " अहो पवित्र ब्राह्मण ! आपण हा कुत्रा कशासाठी घेऊन चाललात आपल्या खांद्यावरून ? "

ह्या वेळी त्या भोळ्या ब्राह्मणाला एवढे आश्चर्य वाटले की त्याने तो बोकड जमिनीवर उतरवून ठेवला आणि तो त्याच्याकडे मोठ्या तीक्ष्ण नजरेने पाहू लागला की हा कुत्रा आहे की बोकड आहे ! आपले डोळे आपल्याला फसवीत नाहीत अशी खात्री झाल्यावर त्याने तो बोकड पुनः आपल्या खांद्यावर घेतला आणि जलद पावले उचलून तो घराकडे निघाला.

पण त्याचे मन फार अस्वस्थ झाले होते, कारण तो त्या दोनही दगलबाजांच्या म्हणण्याचा एकसारखा विचार करीत होता. तों इतक्यात त्याला तिसऱ्या दगलबाजाने वाटेत गाठलेच. या तिसऱ्या दगलबाजानेही मोठ्या अदबीने या ब्राह्मणाला नमस्कार केला आणि म्हणाला " आपण पवित्र ब्राह्मण ! आपण हा अपवित्र कुत्रा खांद्यावर घेऊन कुठे निघालात ? "